ई-विविधा

अंक :०३ जून २०२६

कार्यकारी संपादक
मंदार कुळकर्णी

मुद्रितशोधन
तेजाली शहासने

संपादक मंडळ
वैभवी देशमुख
नितांत पेडणेकर
माधवी मराठे

मार्गदर्शक मंडळ
संहिता हिस्वनकर
आनंद माने
शशिकांत रणवरे

मांडणी व सजावट
वैभवी देशमुख
मंदार कुळकर्णी

प्रकाशन व वितरण
सुनीळ सामंत
ई-साहित्य प्रतिष्ठान

चित्रे
सर्व चित्रे : साभार आंतरजाल व AI

सूचना

ह्या अंकातील लेखनाचे सर्व हक्क त्या त्या लेखकांचे आहेत. Copyright व त्यासंबंधी कायदेशीर प्रक्रियांची जबाबदारी संबंधित लेखकांची आहे. त्याला ई-विविधा तसेच ई-साहित्य प्रतिष्ठान जबाबदार असणार नाही. साहित्यात लेखकांनी व्यक्त केलेली मते पूर्णतः त्यांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेल असे नाही. या अंकातील लेखनाचे आणि फोटोंचे सर्व हक्क त्या त्या लेखकाकडे सुरक्षित असून पूर्ण लेखनाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई(दंड व तुरूंगवास) होऊ शकते. हा अंक वेबसाइटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त इतर कुठल्याही कामासाठी वापरण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

संपादकीय

नमस्कार मंडळी,

ई–विविधाचा तिसरा अंक आपल्या हाती सोपवताना आनंद होत आहे. पहिल्या दोन अंकांनी आमचे ध्येय आणि दिशा स्पष्ट केल्यानंतर तिसरा अंक हे आमचे "ई–विविधा" म्हणून तसे तिसरे पण स्वायत्त नियतकालिक म्हणून पहिले पाऊल म्हणता येईल. खरेतर भारतीय संस्कृतीत संपूर्ण अस्तित्व व्यापणाऱ्या तीन पावलांचे एक वेगळेच महत्व आहे. ते महत्त्व जाणून घेत आमचे तिसरे पाऊल आमच्या पुढील वाटचालीचा प्रारंभ करते.

भारतीय जनमानसात, साहित्यात नेहमीच पावसाचा मुक्त संचार राहिला आहे. कवी कालिदासांच्या मेघदूतापासून ते कवी संदीप खरेंच्या "प्रिये ये निघोनी", कवी सौमित्र ह्यांच्या "गारवा" पर्यंत विविध रूपात पावसाळा आपण अनुभवला आहे. म्हणूनच ह्यावेळी आम्ही हा विशेषांक घेऊन आलो आहोत. पावसाळा एकच असतो, पण तो प्रत्येकाला वेगवेगळे रूप दाखवत असतो. अश्या विविध रूपांचे रेखाटन ह्या ई–विविधेतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

मुंबईची तुंबई करणारा बंडखोर पाऊस, शेतात मळे पिकवणारा सृजनाचा पाऊस, प्रियेची आठवण करून देणारा हळवा पाऊस, चातक चोचीत विसावणारा तृप्तीचा पाऊस इतकी नानाविध रूपे आहेत त्याची. ह्या अंकाचेही तसेच आहे. प्रत्येकाला वेगवेगळा दिसणारा, भेटणारा पाऊस शेवटी एकच असतो. तो कधी नदी होतो, कधी नाला होतो. बालपणी शाळेची, तारुण्यात प्रेयसी/प्रियकराची तर वार्धक्यात आयुष्याची आठवण करून देतो. त्यातून इंद्रधनुष्यही उमलते कधी कधी. इतकं सगळं दिसलं आम्हाला एका पावसाने. हे सगळं तुम्हालाही दिसते का? नक्की सांगा. गरज पडल्यास एखादा मेघदूत शोधून ठेवा!

शब्दांच्या धारांमध्ये चिंब भिजवून भावनांचे अंकुर फुलवणारा पाऊस आला आहे. त्यामुळे एका हातात हा अंक आणि दुसऱ्या हातात कॉफी/चहाचा वाफाळता कप घेऊन सज्ज व्हा!

आपला विश्वासू,
मंदार कुळकर्णी
(कार्यकारी संपादक, ई–विविधा)
तसेच संपूर्ण संपादक मंडळ आणि ई–साहित्य प्रतिष्ठान

अनुक्रमणिका

जुई आणि लिली	०१	शुभांगी पुस्तके
इंद्रधनुष्य	०४	वैभवी देशमुख
थेंब पावसाचे	०७	उज्ज्वला बसोले
पावसाळ्याचा एक दिवस	१०	नितांत पेडणेकर
सरिता	१३	गायत्री साळवणकर
शाळेत जाऊ चला	१४	प्रफुल शेजव
पावसाचे क्षण	१५	सुमन वझुरकर
पावसाचा विचार	१६	मीना ओक
चिंब रानोमाळ	१७	मंदार कुळकर्णी
एक पाऊस	१८	मंगला चौरे
अजून एक प्रयत्न	१९	मेघना शाह
पहिला पाऊस	२०	प्रितम गाडगीळ
शाळेचा पहिला दिवस	२२	जयंत घाटे

त्या साहित्याच्या पानावर जाण्यासाठी पान क्रमांकावर क्लिक करा.

जुई आणि लिली



दुरून भारद्वाजाचा येणारा विशिष्ट आवाज, पावशाचे पेर्ते व्हा, कोकिळेचा कानाला थोडा त्रासच देणारा स्वर, जवळच्या शिरीषावर – बुलबुल, शिंपी, सूर्यपक्ष्यांचा किलबिलाट ऐकतच सकाळी जागी झाले.

बाहेर रिमझिम पाऊस पडत होता. मी बाल्कनीत आले. समोरील सिल्व्हर ओकच्या झाडांचा चंदेरी हिरवा रंग पावसामुळे चमकत होता. जुईच्या फुलांचा सुगंध आला. पांढऱ्या शुभ्र नाजूक फुलांनी जुईचा वेल बहरला होता.

जुईच्या फुलाच्या कुंडीमध्ये पिवळ्या लिलीची रोपे तरारून वर आली होती. नाजूक पिवळी फुले खूप सुंदर दिसत होती. माझ्याही नकळत मन नेहमीप्रमाणे परतवाड्याच्या बागेत जाऊन पोहोचले.

अगदी हीच जोडी परतवाड्याच्या मागच्या लंबगोलाकार आकारातील परसबागेत होती. एका खांबावर वेली–मोगऱ्याचा चढलेला भला मोठा वेल. त्याला शेकड्यांनी येणारी मोगऱ्याची फुले. त्याच्या बाजूला हातपाय धुवायचा नळ. त्याच्यावर जुईचा मांडव. पावसाळा सुरू झाला की मोगऱ्याचा बहर संपत आला असे. तेव्हा जुईच्या वेलावर नाजूक छोट्या छोट्या पांढऱ्या कळ्या दिसू लागत. काही दिवसातच फुलांच्या बहराने जुईचा मांडव पांढराशुभ्र होऊन जाई. हिरव्यागार पानांमध्ये चांदण्यांसारख्या जुईची फुले बघताना मन अगदी हरखून जाई.

काही दिवसातच पावसाचा जोर वाढला की या दृश्यात अजून एक देखणी भर पडे. जुईच्या मांडवाखाली जमिनीवर अचानक लिलीच्या फुलांचा गालिचा पसरत असे. कारंज्यासारख्या हिरव्या पानातून उमललेलं पाच पाकळ्यांचं रेशमी पिवळ्या रंगाचं लिलीचे फूल. त्याच्यामध्ये पाच नाजूक पराग. हिरव्या,पिवळ्या, पांढऱ्या रंगाची इतकी सुंदर रंगसंगती. वारा आला की एका लयीत हलणारी लिलीची फुले म्हणजे पिवळी लाटच जणू! साथीला जुईचा धुंद करणारा सुगंध!

मागच्या हॉलमध्ये झोपाळ्यावर बसून कितीदातरी हा आनंद घेतला आहे; पण मन कधीच भरले नाही. जुईच्या सुगंधासह हे सगळं दृश्य मनाच्या एका कोपऱ्यात कायमस्वरूपी वास्तव्याला आहे. आता अगदी तेच दृश्य, पण मिनिएचर स्वरूपात! खूपच गंमत वाटली.

गेल्या वर्षी प्रत्येक कुंडीत या लिलीने नुसता उच्छाद मांडला होता. फुलांच्या बिया कुंडीत पडून पूर्ण कुंडी लिलीच्या रोपांनी भरून गेली होती. लिलीचे कंद कुंडीच्या मातीत इतके ठाण मांडून बसतात की त्यांना काढणं फारच कठीण गोष्ट आहे. कुंडीतल्या मूळ झाडाची वाढ खुंटेल का असा नकारात्मक विचार उगीचच मनात येतो. लगेचच निसर्गामध्ये असं काही नसतं सगळे एकमेकांना सांभाळून घेतात असंही वाटतं.

याच पिवळ्या लिलीसाठी किती अट्टाहास केला होता! कुठून तरी तीन–चार बिया आणून लावल्या होत्या. रुजण्याची उत्सुकतेने वाट पाहिली होती. अचानक झाडावर फूल आल्यावर किती आनंद झाला होता. छोट्या कपात, नारळाच्या करवंटीत, श्रीखंडाच्या दह्याच्या डब्यात, कशातही या बिया टाकल्या तरी हे नाजूक झाड पिवळ्या फुलांसह फुललं होतं आणि दरवर्षी फुलतं पण. याला ना कोणत्या खताची ना कोणत्या विशेष मातीची गरज लागते.

सगळ्यात आवडणारी गोष्ट म्हणजे कोणतीही पूर्वसूचना न मिळता अक्षरशः क्षणात ही लिली फुलते. एका पावसाच्या सरीची गरज असते हें मात्र नक्की. काहीच हट्ट नाही बिचारीचा. कुठेही, कशीही फुलते. माती वाळली तरी तिचं बी आतमध्ये तग धरून असतं. पाणी टाकलं की पुन्हा पावसाळ्यात फुलून वर येतं. पूर्ण पावसाळाभर रोज एका नवीन कुंडीतून ही लिलीची फुलं डोकावतात. माझ्याकडे पाहून हसतात आणि मला खूप आनंद देतात. जुईचाही वेल एका मोठ्या कुंडीत लावला आहे. बराच मोठा झाला आहे. दरवर्षी भरभरून फुले देतो.

आज जुईच्या कुंडीत खूप सारी रोपे उगवली. न उरवता जुई आणि पिवळी लिली एकत्र आल्या. भूतकाळातले असे सुंदर क्षण मला पुन्हा जगायला मिळाले नि मनावर मोरपीस फिरवून गेले.

- शुभांगी पुस्तके

इंद्रधनुष्य

आज बाहेर दाटून आलेलं आभाळ पाहताना– "हा पाऊस मध्येच कडमडायला नको, वेळेत पोहोचायला हवं" असा विचार करत ,घाई–गडबडीत आवरत असताना मन भूतकाळात गेलं. त्या दिवशी वर्गात लक्ष नव्हतंच मुळी! बाहेर ढग दाटून आलेले होते, अंधार होता, कधीही पाऊस सुरू होणार होता. वर्गात सर प्रकाशाचं अपवर्तन(refraction) शिकवत होते. सरांचं शिकवणं तसं सर्वांनाच आवडायचं. कठीण–कठीण म्हणून बोलबाला असणारा विषय सोपा करून सांगण्यात त्यांची हातोटी होती.

"तर, एखवी एका रेषेत जाणारा हा किरण जर काही अडथळा आला तर परावर्तित होतो", असं म्हणून त्यांनी हातातला आरसा उन्हात तिरपा धरला आणि त्यावरून सूर्याचा प्रकाश पंख्याकडे गेला. "पण, समजा त्या अडथळ्यातून त्याला आरपार जाता आलं तर मात्र तो आपला आधीचा रस्ता बदलतो आणि वेगळ्या दिशेने प्रवास करू लागतो..." यानंतर कोन, वेवलेंथ असले काहीबाही शब्द ऐकू येत होते तेवढंच...

बाहेर दाटून आलेलं आभाळ पाहताना मनात मात्र शंभर प्रश्न उभे राहत होते. "हे सगळं मागच्या वर्षी सुरू झालं, हो तेव्हाच... अचानक कुणाला कुणीतरी आवडायला लागलं, आवाज बदलायला, मुरूम, पुटकुळ्या यायलाही तेव्हाच सुरुवात झालेली...

आतापर्यंत आपण सर्वांसारखे होतो, एकत्र रहायचो, खेळायचो, दूरदूरपर्यंत फिरायला जायचो, आवडीनिवडीही सारख्याच... आता मात्रआपण कुणीतरी वेगळे आहोत याची जाणीव होऊ लागलेली... कुणाला सांगावं का हे? पण काय म्हणतील सगळे? हसतील मला... वेगळं पाडतील कदाचित.." असा सगळा विचार सुरू असताना सरांनी हाक मारल्याने पुन्हा लक्ष शिकवण्याकडे वळलं..

"सूर्याच्या प्रकाशात अनेक रंग असतात. प्रत्येकाची वेवलेंथ वेगळी. या सर्व छटा एकमेकांत मिसळलेल्या असतात. पण या काचेच्या लोलकातून (prism) जाताना प्रत्येकाचा रस्ता बदलतो आणि मग ते असेच वेगवेगळे होऊन बाहेर पडतात, आणि आपल्याला दिसतं ते हे सुंदर इंद्रधनुष्य!"

हे सर्व आठवताना नकळत चेहऱ्यावर एक हसू तरळलं.. "हं.. माणसं काय नि प्रकाश काय सगळं सारखंच.. सर्वांची सुरूवात सारखीच होते; सगळे एकत्र, एकसारखे... मग येतो हा टप्पा, स्वतःची जाणीव होण्याचा, स्वतःचा मार्ग निवडला जाण्याचा.. तिथे वर उन्हाला काळे ढग अडवतात आणि इथे? इथे बरंच काही... समाज, त्यांचे विचार, भीती, चालीरिती, अज्ञान, विरोध, कसलाही सेन्स नसलेले नियम... तरी किरणं रस्ता शोधायला जातातच, पावसाच्या थेंबांतून निघून एक इंद्रधनुष्य उमटवतातच. जिद्द फक्त हवी."

आता बाहेर निघताना हेच सर्व काही नजरेसमोर येत होतं.. थोड्याच वेळात तिथे जमणार होते अनेक जण– आपापली लढाई लढून पुढे आलेले.. कुणाला घरच्यांशी सामना करावा लागलेला; कुणाला अमुक डॉक्टर, तमुक बुवा असले काहीतरी तोडगे सुचवणाऱ्या परिचितांशी; कुणाला सोशल मिडियावर ट्रोल केलं गेलेलं; कुणाला नोकरीत अडचणी आलेल्या... मात्र आज वेगळेपण जपत खंबीरपणे उभं राहून सर्वजण आपापल्या क्षेत्रात वाटचाल करत होते आणि इतरांनासुद्धा प्रेरित करत होते. पाऊस येऊन गेला आणि ढगही विरळ झालेले... एक इंद्रधनुष्य आभाळात उमटलं होतं नि दुसरं प्राइड परेडच्या रस्त्यावर...

LGBTQIA+ प्राइड मंथ हा (काही अपवाद वगळता) सर्वसाधारणपणे जगभरात जून महिन्यात साजरा केला जातो. यात LGBTQIA+ समुदायातील व्यक्तींचे हक्क, कायदेशीर सुधारणा, इ. साठी मागणी करणे, लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, समुदायाचे व स्वतःचे वेगळेपण जपणे, इ. चा समावेश असतो. या समुदायाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अनेक वेगवेगळ्या रंगांचा/ झेंड्यांचा वापर केला जातो. मात्र इंद्रधनुष्यासारखा दिसणारा सहा रंगांचा झेंडा जास्त प्रचलित आहे. यातील लाल रंग हा जीवनाचे, नारंगी आरोग्याचे, पिवळा सूर्यप्रकाशाचे, हिरवा निसर्गाचे, निळा शांतता व निर्मळतेचे आणि जांभळा रंग हा आत्म्याचे प्रतीक आहे.

• वैभवी देशमुख

*सदरील लेख हा काल्पनिक असून, त्यातील माहिती विकिपीडियावरून घेण्यात आलेली आहे.

थेंब पावसाचे

वाऱ्याची झुळूक अंगावर घ्यावी, म्हणून खिडकीशी येऊन उभी राहिले. तप्त झळांनी होरपळणाऱ्या वातावरणात एक प्रकारची स्तब्धता आली होती. जणू काहीतरी होऊ पाहतंय, घडू पाहतंय. कुणाची तरी चाहूल घेतंय. अशा अपूर्णतेच्या तप्ततेवर एक पावसाचा थेंब पडला. खरंतर आकाशात काळे ढग नव्हते, पण तरी एखाद्या चुकार ढगातून काही पावसाचे थेंब जमिनीवर पडू लागले. सुरवातीला तर ते थेंब न नाचता तिथल्या तिथेच जिरून गेले, पण लवकरच त्यातून मृद्गंध दरवळू लागला. वाऱ्याची झुळूक उठली. पावसाच्या थेंबांनी दिलेला गारवा तो वारा रमतगमत जो भेटेल त्याच्यापर्यंत पोहोचवू लागला. त्या गारव्याने दिलेला तजेला आणि ओल्या मातीचा सुवास आता सगळ्यांच्याच तना–मनापर्यंत पोहोचला. एका सुखद अनुभवात त्याची परिणती झाली.

आता थेंबाथेंबांनी म्हणता म्हणता पावसाच्या सरी झाल्या. जमिनीवर खळगा पाडून गोड हसत सर्वत्र धावू लागल्या. एकमेकींना धरण्याचा त्यांचा नाद, लवकरच खेळ बनून राहिला. खेळता खेळता त्यांच्या लक्षात आलं की प्रत्येक थेंबाला कामं वाटली गेली होती. सगळ्या धरतीवर पसरलेल्या बीजांना आमंत्रणं द्यायची होती. झाडांच्या मुळांना खोलवर पाणी पोहोचवायचं

होतं. घरं, झाडांची पानं, धूळ भरली सृष्टी स्वच्छ करायची होती. शेतीकामाला लागायचं होतं. कुठल्याच थेंबांना आता खेळायला वेळ नव्हता. एकत्र होऊन वाहत जात कामं करायची ही वेळ होती. हळूहळू स्वच्छ झालेल्या पानांवरून सरी खाली निथळू लागल्या.
आनंदाने डवरलेली झाडे, आपल्या फांद्यांचे पंख पसरून त्या पहिल्या पावसाच्या सरी झेलत राहिली. तृप्त होत राहिली. चिमण्या पाखरांचे ओले पंख त्यांना आता हवेहवेसे वाटत होते. उन्हाच्या झळांनी पोळलेली त्यांची मऊ मुलायम त्वचा गार ममत्वाचा क्षण अनुभवत होती. कुठेही पानांआड जाऊन दडण्याचा अट्टहास न करता सरींमधे भिजण्याची मौज उपभोगत होते. मातीला आता हिरव्या मखमलीची स्वप्न पडू लागली. झाडांना आपल्या फळाफुलांनी डवरलेल्या दृश्यांचे भविष्य दिसू लागले. धरतीच्या खोल गर्भात फुटणाऱ्या अंकुरामुळे सुखद गुदगुल्या होऊ लागल्या.

हे सगळं मला खिडकीत बसून जाणवत होते. हा तर सृष्टीचक्राच्या खेळाचा भाग होता. मी त्या चक्राचा आनंद घेणारा एक बिंदू होते. पावसाचे काही चुकार थेंब माझ्या हाता–केसांवर घरंगळले. काय होतं त्या स्पर्शात? जुन्या आठवणी, बालपणाचे मुक्त क्षण, तारुण्याची मधुरता, प्रौढावस्थेचे गांभीर्य, वार्धक्यातील जीवनाची क्षणभंगुरता सांगून जाणारे तत्वज्ञान, की वर्तमान क्षणात जाणवणारा ओलसर, थंड, शांत, ताजा स्पर्श? सगळेच तर त्यात सामावलेले होते.

प्रश्न आणि उत्तरही. आता पहिल्या पावसाचं नावीन्य होतं तर पुढे सुरू होणाऱ्या पावसाची गणितं होती.

पावसाच्या आगमनाने मन चिंब भिजलं. हसलं, आनंदलं आणि पुढच्या क्षणात वाऱ्याबरोबर दूर निघून गेलं.

• उज्वला बसोले

पावसाळ्याचा एक दिवस

आपण लहानपणी शाळेत 'पावसाळ्याचा एक दिवस' असा निबंध लिहायचो. तर हा आजचा निबंध!

तीन वर्षांपूर्वीची गोष्ट. त्यादिवशी दुपारी पाऊस नव्हता. छत्री न घेता बाहेर पडलो. नशीब! उन्हासाठी टोपी घेतली नाही. संध्याकाळी सात–साडेसातला गोरेगाव प. वरून परत येताना रिपरिप पाऊस पडत होता. कशाला छत्री विकत घ्यायची? आमच्या लहानपणी प्लॅस्टिकच्या टोप्या मिळायच्या. त्याही कोणी विकत नव्हते. जाऊ भिजत! बोरिवली पूर्वेला उतरलो. तुफान पाऊस पडत होता. लोकलमधून फलाटावर उतरतानाच भिजलो. पुलावर दहा रुपयांचे मोबाईलला कव्हर विकत घेतले. ३०१ जिथून सुटते, त्याच्या समोरील प्रवेशद्वारावर आलो. समोर बसची रांग दिसत होती. सर्व लोक छत्री घेऊन उभे होते. माझ्यासारखे सकाळी छत्री घ्यायचा कंटाळा केलेले खूप लोक माझ्यासोबत उभे होते. अर्धा तासभर उभे होते.

शेवटी, फलाटावरून चालत चर्चगेटच्या दिशेच्या प्रवेशद्वारावर गेलो. तिथे पंधरा मिनिटे उभा राहिलो. शेवटी धाडस करून सुरभीच्या दुकानापर्यंत धावत गेलो. पायात कापडी बूट आणि मोजे! तेही भिजायला लागले होते. दुकानासमोर पाऊस तसेच पागोळ्याचे पाणी अंगावर पडत होते. एका दुकानात छत्री विचारली. फोल्डींगची छत्री न घेता

(२०० रूपये), मोठी २५० रूपयाची छत्री घेतली. त्याने उघडूनच हातात ठेवली. त्यावरील कव्हर काढून त्याने फेकून दिले. थोडे पुढे गेल्यावर मला वाटलं, वरचा भाग गंजला होता. पण नाही, त्याचा रंग चॉकलेटी असल्याने मला तसा भास झाला. परत मागे पावसात जायला जिवावर आले होते. त्याने मागच्या वर्षीची छत्री खपवली होती. आता पाय घोट्यापर्यंत भिजले होते. बुटात पाणी शिरले होते. स्टेशनजवळचा सर्व कचरा वाहत अंगावर येत होता.

बसच्या रांगेत उभा राहिलो. पुलावर अजूनही गर्दी दिसत होती. शनिवार असूनही! आता छत्री गळायला लागली. समोरच्या आणि मागच्या मुलीच्या छत्रीवरून ओघळणारे पाणी माझ्या अंगावर पडत होते. समोरची चौथी ३०१ गेली होती. आता एका तासाने पुढची बस! रिक्षा, स्कुटी, आम्ही एक फुटावर उभे असतानाही पॅन्टवर पाणी उडवत चालल्या होत्या. शेवटी एकदाची माझी बस आली. तिने नुसते स्थानकाजवळील पहिले वळण घ्यायला अर्धा तास घेतला. मोबाईल काढून फोटो काढायला गेलो तर माझ्या खिशातले तिकीट पाण्यात पडून भिजले. पाणी रिक्षाच्या पायाच्यावर प्रवाशांच्या पायापर्यंत वाढले होते. रिक्षा बंद पडायला लागल्या होत्या. एका पावसात मुंबईची तुंबई झाली. आम्ही सर्वांनी वर चढल्यावर पहिल्यांदा एसी बंद केले होते. एक पोलिसांचे बॅरिकेड, एक उभी स्कुटर, प्लास्टिकच्या बाटल्या, गोणी, तोडलेल्या फांद्या वाहत चालल्या होत्या. आम्ही नॅन्सीला पोहोचल्यावर परत बस पंधरा मिनिटे बंद पडली.

इमारतीत आल्यावर कोणीतरी कोळ्यासारखा सजीव चेहऱ्यावर चालायला लागला. त्याला झटकण्याच्या नादात छत्री वगैरे साहित्य खाली पडले. मला तसे करताना पाहून गुळंबेश दुकानदार तणावाखाली आला. (माझी तब्येत बिघडली की काय?) शेवटी एकदाचा घरी पोहोचलो. आणि अशाप्रकारे एका दिवसात मुंबईची तुंबई झाली.

- नितांत पेडणेकर

सरिता

चालली सरिता दरीतून,
कडे–कपारी ओलांडून
प्रीतीचे गाणे आहे ओठात,
ओढीने मिलनाच्या आहे वाहत

आतुरतेने कधी होते खिन्न,
कधी आशेने जाते भरून
बहरती तिच्या स्पर्शाने,
गावे ओसाड होती पुराने

गावेच्या गावे सुखी करीत,
अंधाऱ्या गावी प्रकाश पाडीत,
अखेर तिजला भेटला सागर,
हर्षाने तिचा दाटला उर

सरिता सागरी मिळोनी गेली,
सरिता स्वयें सागर झाली

• गायत्री साळवणकर



शाळेत जाऊ चला ...

शाळेत जाऊ चला
नवं जग पाहू चला ...

बस जाते पुढे पुढे
झाडी जातात मागे
धावती झाडे पाहू चला...

मधल्या सुट्टीत जेवू आपण
डब्यातलं वाटून घेऊ आपण
साऱ्यांचा डबा चाखू चला ...

लवकर उठून तयारी करू
दप्तर घेऊन बाहेर पडू
आईला हसून पाहू चला ...

शाळेत जाऊ चला
नवं जग पाहू चला ...

शाळेत जाऊ चला
नवं जग पाहू चला ...

शाळेत जाऊ चला
नवं जग पाहू चला ...

कधी लिहायला शिकू
कधी वाचायला शिकू
शिकता शिकता खेळू चला ...

शाळेतली गाणी गाऊ सारे
बाबाला गप्पा सांगू सारे
आईला मिठी मारू चला ....

शाळेची बस येता दारी
हळूहळू चढू बसची पायरी
आईला बाय बाय करू चला ...

शाळेत जाऊ चला
नवं जग पाहू चला ...

शाळेत जाऊ चला
नवं जग पाहू चला ...

शाळेत जाऊ चला
नवं जग पाहू चला ...

- प्रफुल राजेंद्रराव शेजव

पावसाचे क्षण

पावसाच्या छमछम पाण्यात
किती नादमधुरता असते
त्याच्या सुंदर लयीमध्ये
हवा शब्द बनून वाहते

दोघांचा जेव्हा होतो संगम
वर्षालहरी विहरत जातात
वाऱ्याबरोबर वाहताना
मनाचे द्वार उघडून देतात

हिरवळ नजरेला सुखावते
नदी किनाऱ्याशी नृत्य करे
थेंबांचा सरगम वाजू लागे
स्पर्शून हवेचे थंड फवारे

पाण्यासोबत वाहताना
मृद्गंध दरवळत राहतो
कुठेतरी सुंदर पक्षी
पाण्यात अंग बुडवून जातो

थांबतो जेव्हा पाऊस तेव्हा
सृष्टी घेते नित्य नूतन रूप
वाराही हळूच विसावे फांदीवर
या क्षणांना आठवावे खूप

• सुमन वझुरकर

पावसाचा विचार

निळ्या–सावळ्या मेघांनी
हळूच हरवली दुपार
आव आपला केवढा
पण रिमझिम पडती तुषार

आधी सूर्याला पळवले
मग केवळ शिंतोडे आले
अंगण जेमतेम ओलावले
आता भिजपावसाने सूर धरले.

उन्हाने कोमेजलेली झाडे
तरारली या पावसाने
तगमगत्या जीवांना
दिलासा दिला वर्षेने

अधूनमधून ढगात
विजा चमकत आहेत
रात्री जोरात येण्याचा
पावसाचा विचार सुरू आहे

• मीना ओक

चिंब रानोमाळ

आले आभाळ बहरून,
बोंडे काळ्या ढगांची तडकली।
त्यांच्या पोटातल्या विजेने,
धाव क्षणात भुईकडे घेतली।।

जणू तडातड फुटती लाह्या,
तश्या अवतरती चंचला।
उष्णतेने लाही–लाही काया,
दाह धरेचा पावसाने थांबवला ।।

वाहू लागले ओघ जळाचे,
ओढे–नाल्यांची उगवली अळींब।
शिवारात साचली पावसाची तळी,
भिजला अख्खा रानोमाळ चिंब।।

काळ्या ढगांचा कळप हाकीत
जाई आभाळी हा वारा।
थरारल्या झाडांमधून सांगे
पानांची सळसळ त्याचा दरारा।।

भिजल्या मातीचा रंग सावळा
पसरला साऱ्या आसमंतात।
पावसाच्या कोनाड्यांतून आकाशी
इंद्रधनुचे रंग उतरले सात।।

वेशीवर न थांबता पाऊस,
आता झिरपला थेट शरीरात।
चिंब भिजली काया वाचा।
मनी भिनली बरसात।।

- मंदार कुळकर्णी

एक पाऊस

सरसर धारांनी
अंगण माझे भिजले गं...
रिमझिम पावसाने
मन हे भिजले गं...

पावसाच्या धारांनी
अवनी ही सजली गं...
जणू हिरवा शालू नेसून
इंद्रधनुष्याच्या खेळामध्ये
पशू–पक्षीही आनंदित होती गं...
आणि गाती सासुरांमधले
गीत हे सुंदर गं ...
सरसर पावसाच्या धारांनी
मन हे भिजले गं...

ओसाड झालेली ही धरणी
हिरवीगार झाली
सगळीच प्रियजन ही आनंदात भिजली गं...
पावसाच्या सरसर धारांनी
इरली, छत्री बाहेर आली गं...

सळसळ वाऱ्याच्या झुळकीत
सरसर पावसाच्या धारेत
सगळेच कसे चिंब भिजले गं...
चिंब भिजले गं...

• मंगला चौरे

अजून एक प्रयत्न



मी प्रयत्न करीत आहे झाड होण्याचा
फूल बनून सुगंध देण्याचा
फळाची अपेक्षा नाही
प्रयत्न आहे डेरेदार वृक्ष होण्याचा

मी प्रयत्न करीत आहे पक्षी होण्याचा
आकाश आणि जमिनीवर राज्य करण्याचा
कवेत घेता नाही आलं तरी चालेल
आनंद घेता येईल मनमुराद भटकण्याचा

मी प्रयत्न करीत आहे निर्झर होण्याचा
डबकं न होता खळखळत वाहण्याचा
नदी नाही होता आलं तरी चालेल
प्रयत्न आहे वाहतं राहण्याचा

मी प्रयत्न करीत आहे पठार होण्याचा
गवतफुलांनी फुलण्याचा
हिरवळ कायमच देता नाही आली तरी चालेल
आनंद घेता येईल फुलण्याचा

आणि
मी प्रयत्न करीत आहे आनंदाने जगण्याचा
'हत्ती नाही होता आलं तरी चालेल
प्रयत्न आहे मुंगी होऊन साखर खाण्याचा'*

• मेघना शहा

*(संदर्भ – मी लहान असताना आई नेहमी म्हणत असे, 'हत्ती होऊन लाकडे फोडण्यापेक्षा मुंगी होऊन साखर खावी. अर्थातच, प्रत्येकाचे अनुभव वेगवेगळे असू शकतात.)

पहिला पाऊस

कोसळून गेलेल्या पहिल्या पावसाचे काही उत्कट थेंब;
परसदारी तुझी वाट पाहणाऱ्या माझ्या कायेवर ओघळू लागले की तुझं
अस्तित्वही जाणवायला लागतं;
केशसंभाराच्या आभाळातील लालिम सिंदूरी भांगापासून;
पावलातल्या मासोळीपर्यंत..

अन् माझे हात चाचपडून पाहू लागतात, अंगांगावर पसरलेल्या फक्त
तुझ्याच जाणिवा;
विलग होऊ लागतात धागे;
मनाच्या कुपीत मुश्किलीने दडवलेल्या पहिल्या पावसाच्या गोड गुपितांचे
डोळ्यांच्या पाणावत जाणाऱ्या कडांपासून !
तेव्हा विरहाचा खारट पाऊस मात्र बरसत राहतो;
डोळ्यांतून माझ्या तनमनावर...
तुला आठवतो का रे तो आपण जगलेला पहिला उच्छृंखल पाऊस अन् ती
ओलेती भेट?
समर्पणाचा खरा अर्थ शिकवणारी आणि एकमेकांच्या कुशीत घट्ट बिलगून
राहिलेले आपण दोघे!
असं वाटलं; आकाशीच्या साऱ्या शलाका
त्या घट्ट मिठीत एकवटल्या आहेत!
ओल्या केसातील मदनबाणाच्या गंधात
मिलनाचा मधुर रंग मिसळला;

आणि तो पहिला पाऊस

तनामनाच्या धरतीला मोहरवून गेला..

येईल का रे ?

पुन्हा एकदा तुला घेऊन;

तोच तो पहिला पाऊस ?

- प्रितफुल प्रित(प्रितम गाडगीळ)

शाळेचा पहिला दिवस

टण्... टण्... टण् ... शाळेची घंटा झाली. ग्राउंडमध्ये आपापसात खेळण्यात दंग असलेली मुलं एकदम आपापला दंगा थांबवून शाळेच्या इमारतीकडे धावली. आता सगळ्यांना नवीन वर्गात बसायचं होतं. व्हरांड्यात ठेवलेली आपापली दप्तरं उचलून मुलं विस्फारल्या डोळ्यांनी वर्गाच्या पाट्या बघत, आपापला वर्ग शोधत एकच गलका करत होती. ज्यांना वर्ग सापडला ती वर्गात घुसून पुढची जागा पटकावण्याच्या धांदलीत धक्काबुक्की करत होती. सुरेश आता पाचवीच्या वर्गात जाण्यासाठी उत्सुक तर होता, पण त्याची पावलं जड झाली होती; कारण त्याचं दप्तर रिकामंच होतं. नवीन वर्षाची पुस्तकं घ्यायला त्याच्या शेतकरी बापाला जमलंच नव्हतं. यंदाच्या अवकाळी पावसानं त्याचं सारं पीक जमीनदोस्त होऊन त्याच्या साऱ्या कुटुंबावर ओल्या दुष्काळाचं सावट पसरलं होतं.

तो कसाबसा चेहरा लपवत पाचवीच्या वर्गात शिरून पार शेवटच्या बाकावर जाऊन बसला. सगळी मुलं आपापल्या दप्तरातून नवी पुस्तकं काढून एकमेकांना दाखवत होती. सुट्टीत काय काय मज्जा केली ते सांगत खळखळून हसत होती. पहिल्या तासाची घंटा झाली आणि नवीन वर्गशिक्षकांची चाहूल लागून वर्गातला गलका थांबला. गुरूजी वर्गात शिरताच "एकसाथ नमस्ते गुरूजी"चा आवाज वर्गात घुमला. गुरूजींनी बसा, बसा म्हटल्यावर मुलं शिस्तीत बसली.

"आता तुम्ही पाचवीच्या वर्गात गेला आहात. सगळ्यांनी नवीन वर्षाची पुस्तकं, वह्या आणल्या आहेत ना?" या गुरुजींच्या प्रश्नावर "हो गुरुजी...." असा संमिश्र घोष झाला. मात्र मागच्या बाकावर बसलेल्या सुरेशची खाली गेलेली मान आणि अस्फुट हुंदका गुरुजींच्या नजरेतून सुटला नाही.

"अरे सुरेश, काय झालं, पुस्तकं वह्या आणल्या आहेस ना?"

"नाही गुरुजी, माझ्या बा'ला सवड नाही झाली. थोड्या दिवसांनी बघू म्हटले."

"असं कसं चालेल? आपल्या हेडमास्तरांनी सक्त ताकीद दिली आहे, की ज्या मुलांकडे पुस्तकं नसतील त्यांना वर्गात बसू द्यायचं नाही म्हणून."

"बरं गुरुजी" असं म्हणून हिरमुसल्या चेहऱ्यानं सुरेश वर्गाबाहेर निघाला. तो दारांबाहेर पडणार, इतक्यात शाळेचा शिपाई एक नोटीस घेऊन आला. गुरुजींनी तो कागद घेऊन त्यावर नजर टाकत एकीकडे सुरेशला हातानेच पुन्हा जागेवर बसण्याची खूण केली. काही न समजून सुरेश पुन्हा जाऊन आपल्या बाकावर बसला. गुरुजींनी नोटीस वाचायला सुरुवात केली...

गेल्या वर्ष अखेरीस राज्य शिक्षण मंडळातर्फे आयोजित जिल्हास्तरीय शालेय निबंध स्पर्धेत आपल्या शाळेच्या चौथ्या इयत्तेतील विद्यार्थी सुरेश तुकाराम माळी याचा प्रथम क्रमांक आला असून त्याला शिष्यवृत्ती म्हणून शालांत परीक्षेपर्यंतच्या सर्व वर्षांसाठी फी माफी आणि सर्व पुस्तकं मंजूर झाली आहेत."

गुरूजींनी वाचून कागद खाली ठेवला आणि वर्गात टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. सुरेश कावराबावरा होऊन एका डोळ्यात आंसू आणि एका डोळ्यात हंसू अशा अवस्थेत कसाबसा उभा राहिला आणि हात जोडून आपल्या वारकरी बापासारखा उद्गारला, "पांडुरंग हरी!"

• जयंत घाटे

आधीचे अंक तुम्ही
इथे वाचू शकता!

फक्त फोटोवर क्लिक
करा आणि वाचा!

हा अंक कसा वाटला? आम्हाला नक्की कळवा!

पुढील अंकात साहित्य पाठविण्यासाठी खालील लिंकवरच्या गुगल फॉर्ममध्ये आपली माहिती भरा आणि साहित्य जोडा. सर्व सूचना, नियम आणि अटी फॉर्म मध्ये दिलेल्या आहेत.

अधिक माहितीकरिता आम्हाला संपर्क करा.

ई–विविधा साहित्य स्वीकृती अर्ज (गुगल फॉर्म) या लिंकवर क्लिक करा किंवा खालील QR कोड स्कॅन करा.

आपण लेखक किंवा कवी आहात का?

आपल्याला स्वतःचे लिखाण प्रकाशित करायचे आहे का?

आमचा संपर्क, एका क्लिकवर:

https://www.esahity.com

@evividha.magazine

Evividha Esahity Magazine

evividha.magazine@gmail.com